MHKO110021892024

**म.कौ.हि.स.अ. अर्ज क्र. ३९/२०२४.**

(CNR No.**MHKO110021892024**)

## निशाणी क्रमांक ०४ खालील आदेश.

(निता पोवार वि. जोतीराम पोवार वगैरे)

प्रस्तुत प्रकरण अर्जदार – निता जोतीराम पोवार हिने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ अन्वये सादर करून प्रस्तुत अर्ज अंतरिम पोटगी मिळण्यासाठी कलम २३ अंतर्गत दाखल केलेला आहे.

### अर्जदार हिचे थोडक्यात कथन पुढील प्रमाणे : -

०२. अर्जदार हिचा विवाह गैरअर्जदार क्र.१ – जोतीराम रामचंद्र पोवार यांच्याशी इचलकरंजी येथे दिनांक १७/०५/२०१२ रोजी हिंदू धर्मशास्त्र व रितीरिवाजाप्रमाणे झाले असून त्याचे लग्नसंबंध अद्यापही कायम आहेत. यातील गैरअर्जदार क्र.२ ह्या अर्जदार हिच्या सासू असून, गैरअर्जदार क्र.३ हे तिचे सासरे आहेत. तसेच, गैरअर्जदार क्र.४ हे अर्जदार हिचे दीर असून गैरअर्जदार क्र.५ ह्या तिच्या नणंद आहेत. गैरअर्जदार क्र.१ हे जन्मतः मूकबधिर असून त्याची माहिती अर्जदार हिला लग्नाआधीपासून होती. अर्जदार हिच्या आई वडिलांनी त्यांच्या ऐपतीप्रमाणे खर्च करून त्यांचे लग्न लावून दिले होते.

०३. लग्नानंतर सुरवातीचे काही दिवस गैरअर्जदार क्र.१ हे अर्जदार हिच्याशी व्यवस्थित वागले. मात्र त्यानंतर गैरअर्जदार क्र.२ ते ५ यांनी गैरअर्जदार क्र.१ यांना अर्जदाराबाबत उलटसुलट सांगून त्यांची कान भरले. त्यामुळे अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांच्यात गैरसमज निर्माण होऊन भांडणतंटा चालू झाला.

गैरअर्जदार क्र.२ व ३ हे नेहमी अर्जदार हिला लग्नामध्ये योग्य मानपान, दागिने न दिल्याच्या कारणावरून अर्जदार हिला अपमानास्पद बोलून मानसिक त्रास देत होते. तसेच वेगवेगळया कारणावरून भांडणतंटा करत होते. याबाबत अर्जदार हिच्या आई-वडिलांनी तसेच नातेवाईकांनी गैरअर्जदार यांना समजावण्याचा प्रयत्न केला असता, गैरअर्जदार यांनी त्यांचा अपमान केला. मात्र अर्जदार ही गैरअर्जदार यांच्यात बदल घडले या आशेवर सर्व त्रास सहन करत होत्या. त्यानंतर, अर्जदार ह्या गरोदर राहिल्यापासून गैरअर्जदार क्र.१ याने सतत दारू पिऊन अर्जदार हिला मारहाण करून शारिरीक त्रास दिलेला आहे. तसेच गैरअर्जदार यांनी अर्जदार गरोदर असताना तिच्या औषधोपचाराचा काहीही खर्च न करता तिला त्रास देऊन माहेरी पाठविले. त्यामुळे, गरोदरपणाचा सर्व खर्च हा अर्जदार हिच्या आईवडिलांनीच केला आहे. तसेच, त्यानंतर देखील गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला तिच्या माहेरच्या परिस्थितीवरून, तिला सतत संशयास्पद व अपमानास्पद बोलून अर्जदार हिचा शारिरीक हिंसाचार करून, तिच्या मुलांना त्यांच्याकडेच ठेऊन घेतले व अर्जदार हिला घराबाहेर हाकलून दिले आहे.

०४. तेंव्हापासून अर्जदार ही तिच्या माहेरी राहण्यास आहे. तसेच, गैरअर्जदार यांनी तिच्या उदरनिर्वाहाची किंवा कपडयालत्त्याची कोणतीही सोय केली नाही. याउलट, गैरअर्जदार क्र.१ हे इचलकरंजी येथे गारमेंट मध्ये नोकरीस असून त्यांना दरमहा रु.२५,०००/- इतका पगार मिळतो. तसेच गैरअर्जदार यांचा डंपरचा व्यवसाय असून त्यातून त्यांना दरमहा रक्कम रु.८०,०००/- इतके उत्पन्न मिळते. सबब, अर्जदार हिने प्रस्तूत अर्ज सादर करून तिला गैरअर्जदार क्र.१ यांच्याकडून दरमहा रक्कम रु.१५,०००/- अंतरिम मासिक पोटगी मिळण्याची विनंती केली आहे.

०५. गैरअर्जदार यांनी **निशाणी क्र.१०** वर त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. गैरअर्जदार यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह

मान्य केला आहे. मात्र इतर सर्व मजकूर त्यांनी नाकारलेला आहे. गैरअर्जदार यांच्या म्हणण्यानुसार विवाहानंतर अर्जदार ही गैरअर्जदार यांच्याशी किरकोळ कारणावरून वाद करू लागली तसेच गैरअर्जदार क्र.१ हे मूकबधिर असल्याचा गैरफायदा घेत अर्जदार ही मनाला येईल तसे वागत होती. तसेच अर्जदार ही सुरूवातीपासून तिला घरची कामे येत नाहीत व तिने तिच्या माहेरी तशी कामे केलेली नाहीत असे सांगून गैरअर्जदार यांच्याशी भांडणतंटा करत होती. तसेच, थोड्या दिवसांनी अर्जदार हिने गैरअर्जदार क्र.१ याच्याकडे वेगळे राहण्याचा हट्ट धरला व त्याच कारणावरून गैरअर्जदार यांच्याशी भांडण केले.

०६. गैरअर्जदार पुढे कथन करतात की, अर्जदार ही त्यांना कोणतीही सूचना न देता वारंवार तिच्या माहेरी जात होती. त्यानंतर गैरअर्जदार हिने प्रविण पवार नामक व्यक्तीशी जवळीक वाढविली. मात्र गैरअर्जदार यांनी कधीही तिच्यावर संशय घेतला नाही. उलट, गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला समजावून सांगून व्यवस्थित संसार करण्याबाबत समज दिली. त्यानंतर, दिनांक ३०/१०/२०२२ रोजी अर्जदार ही गैरअर्जदार यांचा व तिच्या दोन मुलांचा त्याग करून तिच्या माहेरी निघून गेली आहे. त्यावर गैरअर्जदार यांनी तिला पुन्हा नांदण्यास येण्यासाठी वारंवार विनंती करून देखील अर्जदार ही पुन्हा नांदण्यास आली नाही. उलट तिने परत नांदण्यास येण्यासाठी वेगवेगळ्या न पटणाऱ्या मागण्या केल्या आहेत. अर्जदार हिच्या अशा वागण्यामुळे गैरअर्जदार यांनाच मानसिक व शारिरीक छळास सामोरे जावे लागले आहे. गैरअर्जदार क्र.१ हे बेरोजगार असून त्यांचा कोणताही डंपर व्यवसाय नाही. याउलट, अर्जदार ही सुशिक्षित असून तिला शिवणकाम येते व ती शिरोली एम.आय.डी.सी. मध्ये कामाला असून तिला दरमहा अंदाजे रक्कम रू.१५,०००/- पगार मिळत आहे व ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे. त्यामुळे अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र नाही. सबब, गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचा

सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०७. अर्जदार हिने तिच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ **निशाणी क्र.०३** सोबत तिने लग्नाच्या याद्यांची छायांकित प्रत, लग्नाची पत्रीकेची छायांकित प्रत, तिच्या आधरकार्डची छायांकित प्रत व तिच्या नावांच्या गॅझेटची प्रत हजर केली आहे. तसेच, अर्जदार हिने **निशाणी क्र.१३** वर तिचे मालमत्ता दायित्व तथा जबाबदारी प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

०८. अर्जदार व गैरअर्जदार तर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार व गैरअर्जदार यांनी सादर केलेल्या कथनांवरून व युक्तिवादावरून प्रस्तुतच्या अंतरिम अर्जासाठी खालील मुद्दे माझ्या विचारार्थ आले आहेत व त्या मुद्द्यांना मी माझे निष्कर्ष कारणमीमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | सकृतदर्शनी अर्जदार हिचा कौटुंबिक छळ झाल्याचे दिसून येते काय ? | **होकारार्थी.** |
| २ | अर्जदार हिचे स्वतंत्र उत्पन्न नसल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास येते काय ? | **होकारार्थी.** |
| ३. | अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ यांच्याकडून अंतरिम पोटगी म्हणून रक्कम रू.१५,०००/- (पंधरा हजार रुपये) मिळण्यास पात्र आहे काय ? | **अंशतः होकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| ४. | अर्जदार ही मुलांचा ताबा मिळण्यास सकृतदर्शनी पात्र आहे काय ? | **नकारार्थी परंतु मुलांना भेटण्याची परवानगी.** |
| ५. | अर्जदार ही गैरअर्जदार राहात असलेल्या घर मिळकतीमध्ये दोन खोल्या विभागणी करून मिळण्यास सकृतदर्शनी पात्र आहे काय ? | **नकारार्थी.** |
| ६. | काय आदेश ? | **अंतिम आदेशानुसार.** |

## कारणमिमांसा.

### मुद्दा क्रमांक १ ते ५ बाबत -

०९. सदरचे पाचही मुद्द्यांबाबत एकत्रित कथन आल्याने त्यांचे विवेचन मी एकत्रित देत आहे.

१०. सदरचे प्रकरण हे घरगुती अत्याचारापासून महिलांचे रक्षण करण्याच्या कायद्याच्या कलम १२, १७, २० व २१ अन्वये दाखल केले असून प्रस्तुत अर्ज हा अंतरिम पोटगी मिळण्यासाठी कलम २३ अंतर्गत दाखल केलेला आहे. अर्जातील कथने ही मूळ प्रकरणासाठी पुराव्यावर शाबीत होणे आवश्यक आहे. परंतु, कलम २३ अंतर्गत अर्जाचा विचार करतांना दोन्ही पक्षकारांची राहण्याची व त्यांच्या उत्पन्नाची स्थिती याचा विचार करणे आवश्यक ठरते. त्या अनुषंगाने अर्जातील कथने विचारात घेता अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांच्यात पती-पत्नी नाते आजही अस्तित्वात असल्याचे दिसून येते. गैरअर्जदार यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये सदरची बाब मान्य केलेली आहे.

११. प्रस्तुत अर्जाचा विचार करतांना सकृतदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला आहे काय हे पाहणे आवश्यक आहे. यामध्ये गैरअर्जदार यांनी त्याच्या म्हणण्यामध्ये अर्जदार हिचे पर-पुरुषाशी संबंध असल्याबाबतचे कथने नमूद केलेली आहेत. ती स्वतंत्रपणे शाबीत होणे आवश्यक आहेत. त्याचप्रमाणे दोन्ही अपत्यांचा त्याग करून, अर्जदार गेल्याचे देखील गैरअर्जदार यांचे कथन आहे.

१२. सकृतदर्शनी, गैरअर्जदार क्र.१ हे मूकबधिर असल्याचे व सदर वस्तुस्थिती अर्जदार हिला मान्य असल्याचे दिसून येते. त्यामुळे, गैरअर्जदार क्र.१ यांनी अपमानास्पद बोलण्याचा सकृतदर्शनी प्रश्न उद्भवत नाही. त्याचप्रमाणे अर्जदार हिने केलेली कथने देखील स्वतंत्रपणे शाबीत होणे आवश्यक आहे. सद्यःस्थितीत अर्जदार व गैरअर्जदार हे वेगवेगळे राहात असल्याचे अवलोकित होते. अशा परिस्थितीत पती ह्या नात्याने गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिची काळजी घेतली, खर्चासाठी पैसे पाठविले असा कोणताही सकृतदर्शनी पुरावा किंवा कथन दिसून येत नाही. पत्नी ह्या नात्याने गैरअर्जदार क्र.१ यांची अर्जदार हिला सांभाळण्याची कायदेशीर जबाबदारी राहाते. गैरअर्जदार यांनी अर्जदाराच्या उत्पन्नाबाबत कथन मांडले आहे. परंतु त्या करिता कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. आर्थिक शोषण हा कौटुंबिक हिंसाचाराचा एक भाग मानण्यात आला आहे. त्याचा अंतर्भाव कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा - २००५ चे कलम ३ मधील स्पष्टीकरण ४ मध्ये करण्यात आलेले आहे. सबब, अर्जदाराचा सकृतदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला आहे हे दिसून येते.

१३. उभय पक्षकारांमध्ये तणावाचे वातावरण असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीमध्ये सद्यःस्थितीत सकृतदर्शनी मुलांचा ताबा अन्य ठिकाणी वर्ग करणे न्यायोचित राहाणार नाही. परंतु, सदर मुलांना भेटण्याबाबत अर्जदार हिला परवानगी देऊन मुलांच्या व अर्जदार हिच्या हिताचे संरक्षण करणे शक्य आहे. त्याचप्रमाणे

अर्जदार हिने मिळकतीबाबत कोणताही उतारा किंवा परिपूर्ण तपशील सादर केलेला नाही. अशा परिस्थितीत तिला राहण्यासाठी दोन खोल्या विभागून देणे न्यायोचित होणार नाही.

१४. अर्जदार हिने **निशाणी क्र.१३** वर मालमत्ता दायित्व तथा जबाबदारी प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. गैरअर्जदार यांनी निर्देश देऊनही मालमत्ता दायित्व तथा जबाबदारी प्रतिज्ञापत्र सादर केलेले नाही. अशा परिस्थितीमध्ये अर्जदार सांगते त्या प्रमाणे गैरअर्जदाराच्या उत्पन्नावर विश्वास ठेवण्यात कोणतीच अडचण दिसून येत नाही. अर्जदार हिचे शिक्षण इयत्ता नववी पर्यंत झाले असल्याचे दिसून येते. गैरअर्जदार क्र.१ याचे शिक्षण इयत्ता दहावी पर्यंत झाल्याचे दिसून येते. प्राप्त परिस्थितीमधील महागाई व दोन्ही पक्षकारांचे राहाणीमान यांचा विचार करता, अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ कडून दरमहा रक्कम रू.१,२००/- (रक्कम रूपये एक हजार दोनशे मात्र) पोटगी / खावटी खर्च मिळण्यास पात्र राहाते. त्याचप्रमाणे, महिन्यातून प्रत्येक दुसऱ्या व चौथ्या रविवारी दुपारी ०४.०० ते सायंकाळी ०७.०० ह्या वेळेत मुलांना भेटण्याची परवानगी मिळण्यास अर्जदार पात्र राहाते. सबब, अर्ज अंशतः खर्चासह मंजूर होण्यास पात्र राहातो. करिता मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर होकारार्थी, मुद्दा क्र.३ चे उत्तर अंशतः होकारार्थी, मुद्दा क्र.४ चे उत्तर नकारार्थी, परंतु मुलांना भेटण्याची परवानगी, मुद्दा क्र.५ चे उत्तर नकारार्थी देऊन मुद्दा क्र.६ साठी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश.

१. प्रस्तुत अर्ज अंशतः खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिला दरमहा रक्कम रुपये १,२००/- (रक्कम रुपये एक हजार दोनशे मात्र) अंतरिम पोटगी म्हणून, अर्ज दाखल

तारखेपासून, मूळ अर्जाचा निकाल लागेपावतो अथवा पुढील आदेश होईपावेतो द्यावेत.

३. अर्जदार हिला महिन्यातून प्रत्येक दुसऱ्या व चौथ्या रविवारी दुपारी ०४.०० ते सायंकाळी ०७.०० ह्या वेळेत मुलांना भेटण्याची परवानगी देण्यात येते.

४. सदरच्या आदेशाची प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना निःशुल्क देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SHRINIVAS ARUN KULKARNI
Date: 2025.10.16 16:48:04 +0530

दिनांक – १६/१०/२०२५. **(श्रीनिवास अ. कुलकर्णी)**

ठिकाण – पेठवडगांव. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग - पेठवडगांव.